**महाराष्ट्र राज्यात आदिवासी कल्याण / विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती / सामाजिक संस्था यांना देण्यात येणाऱ्या "आदिवासी सेवक पुरस्कार" / "आदिवासी सेवा संस्था पुरस्कार" रक्कमेमध्ये वाढ करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग,**
**शासन निर्णय क्र. आसेपु-२०१४/प्र.क्र.४३/का-१४,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक:- २७ नोव्हेंबर, २०१५.**

**वाचा:-**

१) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. टीआरआय-१०८८/सीआर-१९६/का-०६, दिनांक २५/०८/१९८८.

२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. आसेपु-१०९९/प्र.क्र.०६/का-०५, दिनांक २७/०१/१९९९.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यात आदिवासी कल्याण / विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती / सामाजिक संस्था यांना प्रोत्साहन देण्याच्या तसेच त्यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाकडून अशा व्यक्तींना "आदिवासी सेवक पुरस्कार" व संस्थांना "आदिवासी सेवा संस्था पुरस्कार" देण्यात येतो. याबाबत संदर्भाधीन २ शासन निर्णयान्वये पुरस्कारसंदर्भातील एकत्रित कार्यपध्दती व नियमावली विहित करण्यात आली आहे. त्यानुसार दरवर्षी आदिवासी कल्याण / विकास क्षेत्रात कार्य करणाऱ्या १५ व्यक्तींना "आदिवासी सेवक पुरस्कार" व ७ सामाजिक संस्थाना "आदिवासी सेवा संस्था पुरस्कार" देऊन गौरविण्यात येते, सदर पुरस्कारामध्ये "आदिवासी सेवक पुरस्कार" प्राप्त व्यक्तीस रुपये १०,००१ व "आदिवासी सेवा संस्था पुरस्कार" प्राप्त संस्थेस रुपये २५,००१ एवढी रक्कम देण्यात येते. सदर पुरस्काराच्या रक्कमेमध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

महाराष्ट्र राज्यात आदिवासी कल्याण / विकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती / सामाजिक संस्था यांना प्रोत्साहन देण्याच्या तसेच त्यांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने देण्यात येणाऱ्या "आदिवासी सेवक पुरस्कार" व "आदिवासी सेवा संस्था पुरस्कार" करीता सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून पुढीलप्रमाणे पुरस्कार रक्कम निश्चित करण्यात येत आहे:-

| पुरस्कार | रक्कम |
|---|---|
| आदिवासी सेवक पुरस्कार | रुपये २५,००१ |
| आदिवासी सेवा संस्था पुरस्कार | रुपये ५१,००१ |

२. संदर्भाधीन क्रमांक १ व २ वरील शासन निर्णयान्वये “आदिवासी सेवक पुरस्कार” व “आदिवासी सेवा संस्था पुरस्कार” याबाबत कार्यपध्दती व नियमावली विहित करण्यात आली आहे, त्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना जशाच्या तशा लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने अनौपचारीक संदर्भ क्र. २७३/व्यय-१४, दिनांक ०७/१०/२०१५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०१५११२७१५२९०३१९२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f05a6913f9dee1f453c9a1c5a89d8c4897737ba8e4ac0edf3f2c6e69e25f4108, cn=Ravindra Digambarrao Aute
Date: 2015.11.27 15:35:17 +05'30'

**( रविंद्र दि. औटे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव.
४. मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
६. मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
८. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
९. अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे / नाशिक / नागपूर / अमरावती.
१०.सर्व जिल्हाधिकारी.
११.सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
१२.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेता) महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर.
१३.महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १ / २, मुंबई / नागपूर
१४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१५.जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
१६.माहिती व प्रसिध्दी संचालनालयातील आदिवासी विकास विभागाचे संपर्क अधिकारी.
१७. सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्या.अधिकारी,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय,
१८. निवडनस्ती.(का.१४)आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई